-: प्रेसनोट दिनांक- १३/०८/२०२० :-

**उमेश आनंदराव जाधव, सहायक पोलीस फौजदार, नेम. पन्हाळा पोलीस ठाणे, कोल्हापूर, सध्या रा. डी वार्ड शुक्रवार पेठ, कुभांर गल्ली, कोल्हापूर यांनी लाच मागणी करून लाच स्विकारलेबाबत.........**

---

यातील तक्रारदार त्यांचा मुलगा व पुतण्या यांचेवर पन्हाळा पोलीस ठाणे येथे गु.र.न.१९२/२०२० भा.द. वि.स.कलम ३५३ प्रमाणे गुन्हा दाखल आहे. सदर गुन्हयाचा तपास पन्हाळा पोलीस ठाणेचे सहायक फौजदार उमेश जाधव हे करीत आहेत.

यातील तक्रारदार यांना सहायक पोलीस फौजदार उमेश जाधव यांनी तुम्हाला व तुमचा मुलगा व पुतण्या यांचेवर दाखल असले गुन्हयात मदत करतो तुम्ही मला प्रत्येक जणाचे ५०००/- रू प्रमाणे ०३ जणांचे १५०००/- रूपये द्या असे म्हणुन लाचेची मागणी केलेने तक्रारदार यांनी आज दिनांक १३/०८/२०२० रोजी ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर येथे तक्रार दिली होती.

तक्रारदार यांचे तक्रारीप्रमाणे आज दिनांक १३/०८/२०२० रोजी सहायक पोलीस फौजदार उमेश जाधव यांची कोल्हापूर येथे शासकीय पंच साक्षीदारांचे समक्ष लाचेच्या मागणीची पडताळणी केली असता, पडताळणीमध्ये सहायक पोलीस फौजदार उमेश जाधव यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांचेविरूध्द व त्यांचा मुलगा व पुतण्या यांचेवर दाखल असले गुन्हयामध्ये मदत करण्यासाठी तडजोडीअंती २५,०००/- रू. लाचेची मागणी करून ती लाच रक्कम लागलीच घेवुन येण्यास सांगितलेचे निष्पन्न झाले.

त्यानंतर सहायक फौजदार जाधव यांनी त्यांनी तक्रारदार यांचेकडे दाखल गुन्हयामध्ये मदत करण्यासाठी तडजोडीअंती मागणी केलेप्रमाणे २५,०००/- रू. लाच रक्कम घेवुन गंगावेश कोल्हापूर येथे घेवुन येण्यासाठी सांगीतले त्याप्रमाणे गंगावेश कोल्हापूर येथे सापळा आयोजीत केला. त्यानंतर सहायक फौजदार जाधव यांनी तक्रारदार यांना कसबापेठ पोलीस चौकी जवळ येण्यास सांगीतले त्याप्रमाणे कसबा पेठ पोलीस चौकी येथे सापळा आयोजीत केला. सदर ठिकाणी सहायक फौजदार जाधव यांनी तडजोडीअंती तक्रारदार यांचेकडुन २२,०००/- रू. लाच रक्कम स्विकारल्याने त्यास रंगेहात पकडणेत आले आहे. सदरबाबत तक्रारदार/फिर्यादी यांचे फिर्यादीवरून उमेश आनंदराव जाधव, सहायक पोलीस फौजदार, नेम. पन्हाळा पोलीस ठाणे, कोल्हापूर, सध्या रा. डी वार्ड शुक्रवार पेठ, कुभांर गल्ली, कोल्हापूर यांचेविरूध्द राजवाडा पोलीस ठाणे, कोल्हापूर येथे गुन्हा दाखल करणेची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कारवाई श्री. राजेश बनसोडे, पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे व श्रीमती सुषमा चव्हाण, अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे यांचे मार्गदर्शनानुसार श्री. आदिनाथ बुधवंत, पोलीस उपअधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर, श्री युवराज सरनोबत, पोलीस निरीक्षक, पोहेकॉ शरद पोरे, पोना नवनाथ कदम, पोना विकास माने,पोकॉ मयुर देसाई, ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांनी केली आहे.

**सर्व नागरिकांना आवाहन करणेत येते की, लाचेच्या अथवा अपसंपदेबाबत तक्रारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील कंमाकावर संपर्क साधावा.**

**१)मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा.मुंबई टोल फ्री कमांक :- १८००२२२०२१**

**२)मा.पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे दुरध्वनी कमांक :- ०२०/२६१२२१३४, ०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३.**

**३)श्री.आदिनाथ बुधवंत, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कोल्हापूर मो.नं. ९०११२२८३३३, कार्यालय दुरध्वनी कमांक - ०२३१/२५४०९८९.**

**४)हेल्पलाईन टोल फ्री कमांकः- १०६४, ५) व्हॉटस अप कमांक :- ७८७५३३३३३३.**